महत्वाचे

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११०१८.
क्र. लेखा / ४२ /कावि/४६५ /२०२३
दि.१९ / ०६ /२०२३

विषय :- मनपा सेवेतून सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांचे धन्वंतरी स्वास्थ योजनेचे सभासदत्वाबाबत...

परिपत्रक,

पिंपरी चिंचवड मनपा आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी तसेच सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांचे करीता धन्वंतरी स्वास्थ योजना-२०१३ चे धोरण तयार केले आहे. सदर धोरणांस मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४७५ दि.२०/०२/२०१४ व ठराव क्रमांक ५४९ दि.१९/०८/२०१७ अन्वये मान्यता दिलेली आहे. या धोरणाप्रमाणे मनपा आस्थापनेवर कार्यरत असलेल्या संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांचे दरमहा चे वेतनातून र.रु.३००/- (अक्षरी र.रु.तीनशे फक्त) तसेच सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांचे दरमहा चे वेतनातून र.रु.१५०/- (अक्षरी र.रु.दीडशे फक्त) माहे जुन २०१५ पासून कपात करण्यास मा. आयुक्तसो यांनी आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५४९/२०१५, दि.०७/०५/२०१५ नुसार मान्यता दिलेली आहे.

सद्यस्थितीत महापालिका आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी मनपा सेवेतून सेवानिवृत्त होण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून सेवानिवृत्त झालेनंतर लेखा विभागामार्फत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यास सेवानिवृत्ती निवृत्ती वेतन मंजूर करून पी.पी.ओ. क्रमांक देण्यात येतो. तथापि सदरचे कार्यवाहीकामी काही कालावधी लागतो. सदरच्या कालावधीमध्ये सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांना धन्वंतरी स्वास्थ योजने अंतर्गत वैद्यकिय उपचाराची गरज निर्माण झालेस सदर सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांची वैद्यकिय उपचाराची गैरसोय होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांचे सेवानिवृत्तीनंतर सलग वैद्यकिय उपचाराची सेवा उपलब्ध होणेकामी खालील प्रमाणे सुधारणा करणेत येत आहे.

१) सामान्य प्रशासन विभागाकडून अधिकारी / कर्मचारी यांचे सेवानिवृत्ती आदेश निर्गत झालेनंतर सदर आदेशातील कर्मचारी सेवानिवृत्त झालेनंतर लगेचच संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचा धन्वंतरी स्वास्थ योजनेत समावेश होईल व सेवानिवृत्ती आदेशाचा क्रमांक हाच धन्वंतरी योजनेचा तात्पुरता संकेतांक राहील. सेवानिवृत्त निवृत्ती वेतन आदेश (PPO) निर्गत झाले नंतर सेवानिवृत्ती वेतन आदेश क्रमांक हा संकेतांक असेल.

२) अधिकारी / कर्मचारी यांचे सेवानिवृत्तनंतर निवृत्ती वेतन आदेश (PPO) निर्गत होईपर्यंतच्या कालावधीची कर्मचाऱ्यांच्या हिस्साचे वर्गणीची रक्कम त्यांचे निवृत्ती वेतनातून कपात करणेत येईल व त्याकामी सेवानिवृत्त होणारे कर्मचाऱ्याचे सेवानिवृत्ती प्रकरण लेखा विभागाकडे पाठविताना संबंधित विभागाने तसे संबंधित कर्मचाऱ्याचे धन्वंतरी स्वास्थ योजनेचे संमतीपत्र घेऊन प्रकरण सादर करावे.

३) अधिकारी / कर्मचारी यांचे धन्वंतरी स्वास्थ योजना सभासदत्व देणे व त्याची संगणक प्रणालीमध्ये नोंद घेणेची कार्यवाही धन्वंतरी कक्षाकडून करणेत यावी.

(शेखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११०१८.

प्रति –
सर्व शाखाप्रमुख / विभागप्रमुख
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११०१८.